# श्रीरामकृष्ण परमहंस देव (जन्म १८३६- महासमाधी १८८६)

भगवान श्रीरामकृष्ण हे दिव्यत्वाची सजीव प्रतिमाच होत. त्यांचे जीवन म्हणजे सनातन धर्माचे मूर्त रूप होय. ते स्थलकाल-निरपेक्ष असून अखिल मानवजातीला पथप्रदर्शन करणारे असे आहे. त्यांच्या जीवनातील अगदी सामान्य प्रसंगांना देखील गूढ गहन अर्थ आहे. त्यांच्या उक्ती म्हणजे नुसते शब्द नसून त्यांतून त्यांची अनुभूतीच प्रकटली आहे व याच कारणास्तव त्यात माणसाच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचे उत्कट सामर्थ्य आढळून येते.

श्रीरामकृष्णांचा जन्म कलकत्त्याहून पश्चिमेकडे सत्तर मैलाच्या अंतरावर असलेले कामारपुकुर या गावी बुधवार, दि. १७ फेब्रुवारी १८३६ रोजी पहाटे (शके १७५७ फाल्गुन शुद्ध द्वितीया) झाला. त्यांचे लहानपणीचे नाव गदाधर होते. धार्मिकता, श्रद्धा-भक्ती आणि सरलता यांनी पूर्ण अशा ग्रामीण वातावरणात वाढल्यामुळे गदाधराच्या हृदयात लहानपणापासूनच ईश्वरदर्शनाची तीव्र स्पृहा निर्माण झाली. लिहिण्यावाचण्याकडे विशेष लक्ष न देता तो साधु-संन्यासी आणि तीर्थयात्रेकरू मंडळींच्या सहवासात अधिकांश वेळ घालवीत असे आणि आपल्या सवंगड्यांबरोबर धार्मिक नाटके करण्यात मग्न राहत असे. गदाधर नऊ गदाधर वर्षांचा झाल्यावर त्याची मुंज केली असता त्याने वचन दिल्याप्रमाणे धनी लोहारणीच्या हातून पहिली भिक्ष ग्रहण केली. चवदा वर्षांच्या लहान वयात त्याने आपली अनेक ठाम मते बनविली होती. विद्वानांच्या अंगचा अहंकार पाहून त्याला अतिशय वाईट वाटे व त्यांची कीव येई. दुरभिमान उत्पन्न करणारी ग्रांथिक विद्या हानिकारक आहे असे त्याने मनाशी ठरविले. गावातील सगळ्या भांडणांच्या मुळाशी पैसा आहे हे पाहून त्याला पैशाविषयी तिटकारा वाटे.

गदाधरांचे अभ्यासाकडे लक्ष नसल्याचे पाहून एक दिवस मोठे भाऊ रामकुमारांनी त्याला बराच वेळ आपल्या जवळ बसवून घेतले व अभ्यास करण्याविषयी खूप उपदेश केला. त्यावर गदाधर ठामपणे म्हणाला, ''दादा, मला केवळ भाजी-भाकरी मिळवून देणारी विद्या शिकायची नाही. जिने हृदयात परमज्ञानाचा उदय होतो आणि मानवी जीवन कृतार्थ होते अशी विद्या मला शिकायची आहे.'' सतरा वर्षांचा झाला तेव्हा शिक्षणाकडे त्याचे मन वळावे म्हणून त्याच्या मोठ्या भावाने त्याला कलकत्त्यात आणले. परंतु गदाधराला दिसून आले की धनोपार्जन हेच सर्व प्रकारच्या लौकिक विद्यांचे उद्दिष्ट आहे. त्याने मनोमन निश्चय केला की ज्याने शाश्वत शांती लाभते अशा अध्यात्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीच आपण प्रयत्न करायचा.

नंतर परिस्थितीमधे अशा प्रकारची परिवर्तने घडून आली की थोड्याच काळात श्रीरामकृष्णांना दक्षिणेश्वर येथील कालीमंदिराचे पुजारी बनावे लागले. कलकत्ता येथील एक श्रीमंत आणि धर्मपरायण विधवा राणी रासमणी हिने ते मंदिर बांधले होते. देवपूजा हे श्रीरामकृष्णांचे आवडीचे काम होते. ते अत्यंत उत्साहाने हे काम करू लागले. हळूहळू त्यांच्या पूजेचे स्वरूप बदलत गेले. जगदंबेच्या प्रत्यक्ष दर्शनाची उत्कट स्पृहा त्यांच्या हृदयात उदय पावली. त्यासाठी ते रात्रंदिवस प्रार्थना करीत, ध्यान करीत आणि व्याकुळ होऊन रडत. दिवस मावळला म्हणजे ते रडत रडत मातेला म्हणत, ''आई, आणखी एक दिवस निघून गेला, अजून मला तुझे दर्शन लाभले नाही.'' त्यांचे जेवण फार कमी झाले, झोप तर अजीबात गेली. शेवटी एके दिवशी त्यांना मातेचे दर्शन प्राप्त झाले.

श्रीरामकृष्ण मग कठोर साधनेत रत झाले. त्यांनी हिंदूधर्मातील निरनिराळ्या मतांची व तसेच ख्रिस्ती आणि इस्लाम धर्मांची साधना केली व भगवंताचा साक्षात्कार करून घेतला. अशा प्रकारे निरनिराळ्या मार्गांनी जाऊन भगवंताशी एकत्वाचा आस्वाद त्यांनी घेतला. ते कधी संपूर्णपणे अद्वैतभावात लीन असत तर कधी बाहेरून द्वैत ठेवून जगदंबेच्या शिशूप्रमाणे वागत. अशा तऱ्हेच्या अनुभवानंतर त्यांनी सांगितले – ''मी बघितले की ईश्वर एकच असून सर्व धर्म त्याच्याचकडे अग्रेसर होत आहेत.''


श्रीरामकृष्ण या दिव्यानंदाचा आस्वाद घेण्यात मग्न होते. परंतु त्यांच्या गावी अशी वार्ता पोहोचली की ते वेडे झाले आहेत. त्यांचे वेड बरे व्हावे म्हणून त्यांची आई आणि मोठे भाऊ यांनी श्रीसारदादेवींशी त्यांचा विवाह करून दिला. हा विवाह फारच अद्‌भुत होता. श्रीरामकृष्ण आपल्या पत्नीला जगदंबा मानून तिची पूजा करायचे. एकदा श्रीरामकृष्णांचे पाय चेपून देत असता श्रीसारदादेवींनी विचारले, ''तुम्ही माझ्याकडे कोणत्या दृष्टीने बघता?'' त्यावर श्रीरामकृष्ण उत्तरले, ''कालीमंदिरात जी आई (जगदंबा) आहे, तिनेच माझ्या या शरीराला जन्म दिला असून सध्या ती (त्यांची जन्मदाती आई) नौबतखान्यात राहत आहे. आणि आता तीच (सारदादेवी) माझे पाय चेपीत आहे. मी तुमच्याकडे आनंदमयी जगदंबा या दृष्टीनेच बघत असतो.'' त्या दांपत्याचे मीलन आध्यात्मिक भूमिकेवरच होत असे. तरी देखील श्रीरामकृष्णांनी श्रीसारदादेवींना घरातील लहानमोठ्या सर्व कामांपासून ब्रह्मज्ञानापर्यंतच्या सर्वच विषयांचे शिक्षण दिले होते, सर्वच साधना शिकविल्या होत्या. श्रीरामकृष्णांप्रमाणेच श्रीसारदादेवी पवित्रतेहून अधिक पवित्र होत्या. त्या मूर्तिमंत पावित्र्यच होत्या.

श्रीरामकृष्ण म्हणत असत – ''कमळ उमलले म्हणजे भुंगे आपोआप येऊन हजर होतात.'' सर्वच स्तरांचे, सर्वच धर्मांचे स्त्री-पुरुष त्यांच्याकडे मन:शांतीसाठी येऊ लागले. जो कोणी खरीखुरी स्पृहा घेऊन त्यांच्याकडे येई, त्याला त्यांच्या असीम प्रेमाचा प्रत्यय येई आणि त्यांचा सत्संग आणि उपदेश प्राप्त करून तो आध्यात्मिक जीवनात उन्नती साधून घेई.

श्रीरामकृष्णांनी १६ ऑगस्ट १८८६ रोजी महासमाधी घेतली. परंतु त्यापूर्वीच त्यांनी आपला आध्यात्मिक संदेश व जीवितकार्य पुढे चालविण्याकरता काही तरुणमंडळींना विशेष रीतीने प्रशिक्षण देऊन तयार केले होते. श्रीरामकृष्णांच्या महासमाधीनंतर या तरुणांनी संसारत्याग करून संन्यास घेतला व त्यांच्या नावाने एक संन्यासी-संघ निर्माण केला. 'आत्मनो मोक्षार्थ जगद्धिताय च' – स्वत:ची मुक्ती आणि संपूर्ण जगाचे हित साधणे हेच या संघाचे ध्येय असून त्याच्या निर्माणकार्यात स्वामी विवेकानंदांचा वाटा सर्वात जास्त आहे. त्यांच्याच गतिशील आणि ओजस्वी नेतृत्वाखाली त्या सर्व गुरुबंधूंनी श्रीरामकृष्णांचा दिव्य संदेश भारतात व परदेशात प्रसृत केला.

# श्रीरामकृष्णांचे उपदेश

- अहंकार दोन प्रकारचा – एक पक्का अहंकार, दुसरा कच्चा अहंकार. माझे घर, माझी दौलत, माझी मुले, अशी भावना – हा झाला कच्चा अहंकार; आणि मी ईश्वराचा दास, त्याचा बालक, तोच नित्य-मुक्त-ज्ञानस्वरूप मी आहे अशी भावना – हा झाला पक्का अहंकार.
- परमेश्वर साकार आहे आणि निराकारही. परत तो साकार-निराकार दोन्हींच्या पलीकडेही आहे. तो खरोखर काय आहे हे तोच जाणतो. भक्तांसाठी तो नाना रूपांनी व नाना भावांनी प्रगट होत असतो. साकार किंवा निराकार यातील कशानेच तो मर्यादित होत नाही. साकार काय नि निराकार काय, आहे ठाऊक? बर्फ नि पाणी; पाणी गोठून जमते तेव्हा साकार; वितळून परत पाणी होते – निराकार.
- ब्रह्म आणि शक्ती अभिन्न आहेत. वस्तू एकच. जेव्हा ती निष्क्रिय असते, सृष्टि-स्थिति-प्रलयाचे कार्य करीत नाही, तेव्हा आपण तिला ब्रह्म म्हणतो आणि जेव्हा ती ही कार्ये करीत असते तेव्हा तिला शक्ती म्हणतो, काली म्हणतो.
- दुर्लभ मानवदेह लाभूनही जो याच जीवनात त्या सच्चिदानंदस्वरूप भगवंताच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करीत नाही त्याचा जन्मच व्यर्थ आहे.
- विवेक-वैराग्यावाचून शास्त्रपठन व्यर्थ. विवेक-वैराग्याविना धर्मलाभ होणे नाही. हे सत् नि ते असत् असा विचार करून सद्‌वस्तूचे ग्रहण हाच विवेक. आत्मा निराळा अन् देह निराळा असल्या विचारज्ञानालाच विवेक म्हणतात. विषयासंबंधी वितृष्णा म्हणजे वैराग्य. नेहमी सदसत्-विवेक करीत राहिले पाहिजे – ईश्वरच एकमेव सद्‌वस्तू आहे, शाश्वत आहे; बाकी सर्व काही असत् आहे, नश्वर आहे. अशा प्रकारे विवेक करीत जाऊन असत्, नश्वर विषय मनातून झिडकारून टाकले पाहिजेत.
- प्रेमभक्ती मिळवण्यासाठी निर्जन जागी गेले पाहिजे. दुधापासून लोणी काढावयाचे झाल्यास त्यास निवांत जागी ठेवून विरजण लावावे लागते; गडबडीच्या ठिकाणी दही नीट जमत नाही. दही जमल्यानंतर सर्व कामे सोडून शांत ठिकाणी बसून ते घुसळावे लागते. मगच लोणी मिळते. तसेच निर्जन जागी भगवंताचे ध्यान केले म्हणजे ज्ञान, वैराग्य, भक्ती लाभतात.
- लज्जा, घृणा आणि भीती या तीन असेपर्यंत भगवंताचे दर्शन लाभत नाही.
- जितकी मते तितके मार्ग. ह्या कालीमंदिरात यायचे झाल्यास कुणी नावेतून, कुणी गाडीतून तर कुणी पायी येतात, तद्वतच भिन्न भिन्न लोकांना भिन्न भिन्न मतांच्या द्वारे सच्चिदानंदाचा लाभ होत असतो.
- जो भगवंतासाठी व्याकुळ झालेला आहे तो खाणेपिणे वगैरेंसारख्या क्षुल्लक गोष्टींकडे लक्षच देऊ शकत नाही.
- संसारातील वस्तूंविषयी थोडीदेखील आसक्ती असेपर्यंत भगवान लाभत नाही. दोऱ्याच्या टोकाला एक लहानसा तंतू जरी असला तरी तो सुईच्या छिद्रातून जात नाही.
- सत्संग, साधुसंग हे धर्मसाधनेचे प्रमुख अंग होय.
- मन आणि मुख एक करून प्रामाणिकपणे प्रार्थना केली म्हणजे भगवान ती ऐकतात.
- ढोंगी, हिशेबी आणि तर्कट वृत्तीने भगवंताचा लाभ होत नाही. विश्वास आणि सच्चेपणा हवा. भगवान सच्च्या हृदयाच्या माणसाच्या फार जवळ आहे. पण कपटी माणसापासून तो फार दूर आहे.
- ज्ञान एकत्वाकडे घेऊन जाते, अज्ञान नानात्वाकडे.
- विषयसुखांविषयीची आसक्ती जितकी कमी होते तितकीच भगवंताविषयीची भक्ती वाढते.
- संसार ही कर्मभूमी होय. येथे आपण कर्म करायला आलो आहोत. जसे कोणाचे खेड्यात घर असते; पण तो कलकत्त्याला येऊन काम करतो.
- गुरू एकच असतो, परंतु उपगुरू अनेक असू शकतात. ज्याच्याकडे काही शिकता येते तोच उपगुरू. भागवतात लिहिले आहे की अवधूतांनी असले चोवीस उपगुरू केले होते.
- गृहस्थाश्रमी माणसाचे कर्तव्य आहे – जीवावर दया, भक्तांची सेवा आणि भगवंताचे नामस्मरण.
- गीता वाचून जे ज्ञान मिळते तेच बारा वेळ गीता शब्दाचा उच्चार केल्यानेही मिळते; जसे गी-तागी-तागी-तागी (त्यागी त्यागी त्यागी), अर्थात हे जीवा, सर्वस्वाचा त्याग करून ईश्वराच्या चरणकमलांचा आश्रय घे.
- भगवत्प्राप्तीसाठी या काही गोष्टी पाहिजेत – साधुसंग, विवेक आणि सद्‌गुरूची कृपा.
- सतत भगवंताचे नामस्मरण करा. कलियुगात भगवन्नामस्मरण फार प्रभावकारी आहे. या युगात योगसाधना शक्य नाही. कारण जीवाचा प्राण अन्नावर अवलंबून आहे. टाळ्या वाजवत भगवंताचे नाम घेत गेले म्हणजे तुमच्या देहवृक्षावरील पापरूपी पक्षी उडून जातील.
- गंगाजल जल नव्हे, श्रीवृंदावनातील धूळ धूळ नव्हे, आणि श्रीजगन्नाथदेवाचा महाप्रसाद अन्न नव्हे. ही तिन्ही ब्रह्माची रूपे होत.
- पाण्यात नाव राहिली तर काही हरकत नाही, परंतु नावेत मात्र पाणी शिरू देता कामा नये, नाही तर ती बुडून जाईल. त्याचप्रमाणे साधक संसारात राहतो आहे, राहो. पण साधकाच्या मनात मात्र संसार न राहो म्हणजे झाले.
- आगगाडीचे इंजिन स्वत: निघून जाते, इतकेच नव्हे तर मालाने गच्च भरलेले कित्येक डबेही आपल्याबरोबर ओढून घेऊन जाते. अवतार देखील सहस्त्र सहस्त्र जीवांना भगवंताच्या श्रीचरणापाशी घेऊन जातात.






# माताजी श्रीसारदादेवी (जन्म १८५३- महासमाधी १९२०)

मानवजातीच्या उद्धारासाठी अवतरलेल्या वर्तमानयुगावतार भगवान श्रीरामकृष्ण यांची दिव्यलीला पुष्ट व परिपूर्ण करण्याकरिता साक्षात ब्रह्मशक्तीच श्रीसारदादेवींच्या रूपात त्यांची सहधर्मचारिणी म्हणून अवनीतलावर प्रकटली होती. जडवादाच्या – भोगवादाच्या – घोर अंधकारात मग्न अशा वर्तमान जगासमोर त्यांनी दिव्य मातृभावाचा परमपावन असा आदर्श प्रस्थापित केला. त्यांचे हे दिव्य मातृत्व आदर्श कन्या, आदर्श पत्नी, आदर्श गृहिणी, आदर्श संन्यासिनी, आदर्श गुरू इत्यादी अनेकविध रूपांतून प्रकट झाले आहे. पावित्र्य, सरलता, प्रेम, करुणा, त्याग, सेवा इत्यादी असंख्य दैवी गुणांनी विभूषित असे त्यांचे सोज्वळ जीवन आणि त्यांच्या श्रीमुखातून सहजपणे निघालेले उपदेश मोहग्रस्त व संसारासक्त जीवांना परमपदप्राप्तीचा मार्ग दाखवितात.

भगवान श्रीरामकृष्णांच्या लीलासहधर्मचारिणी श्रीसारदामणिदेवी ह्यांना त्यांचे लक्षावधी भक्त पूज्य माताजी म्हणूनच ओळखतात. त्यांचा जन्म पश्चिम बंगालमधील बांकुरा जिल्ह्यातील जयरामवाटी नावाच्या एका लहानशा आडवळणी खेड्यात दि. २२ डिसेंबर १८५३ (मार्गशीर्ष कृष्ण सप्तमी) रोजी निर्धन परंतु धार्मिक आईबापांच्या पोटी झाला.

सारदामणी लहानपणापासूनच शांत आणि सरळ स्वभावाच्या होत्या. अगदी मूर्तिमंत सरळपणा. खेळामध्ये मैत्रिणींशी त्यांचे कधीही भांडण होत नसे. दुसऱ्यांची भांडणे त्याच सोडवत असत. त्या देवीदेवतांच्या मूर्ती बनवून बेल-फुले वाहून त्यांची पूजा करीत व ध्यानात मग्न होऊन जात. सारेजण त्यांच्यावर प्रेम करत व त्यांना प्रेमाने 'सारू' म्हणून हाक मारत. सारदादेवींमध्ये जी दया, करुणा व सहानुभूती बाल्यावस्थेत दिसून येत होती तीच पुढे त्यांच्या विश्वमातृत्वात परिणत झाली. त्यांचे मातृत्व विविध अंगांनी विकसित झाले. त्या मातृत्वाच्या स्पर्शाने हजारो लोकांची जीवने दिव्य सुगंधाने फुलून गेली.

खेडवळ वातावरणात वाढलेल्या त्या मुलीचा विवाह सहा वर्षांच्या कोवळ्या वयात श्रीरामकृष्णांशी झाला. श्रीरामकृष्णांच्या जीवनातील अन्य अनेक घटनांप्रमाणेच त्यांचे लग्नही एक वैशिष्ट्यपूर्ण घटना आहे. लग्नानंतर बराच काळ निघून गेला. सन १८६७च्या सुमारास पूज्य माताजींना श्रीरामकृष्णांचा निकट परिचय प्राप्त करून घेण्याची संधी मिळाली. श्रीरामकृष्णांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष तर केले नाहीच; उलट ते त्यांचे पालक बनले आणि हळूहळू मोठ्या प्रेमाने त्यांनी माताजींना मानवी स्वभावाचे सूक्ष्म ज्ञान अवगत करून दिले. तसेच, ह्या जगात पूर्णत: ईश्वरार्पणबुद्धीने कसे वागायचे हे श्रीरामकृष्णांनी त्यांना शिकविले. त्यांनी पूज्य माताजींची महन्मंगला माता म्हणून अक्षरश: पूजा केली. ते असे म्हणत की, मंदिरातील कालीमाता आणि श्रीसारदामाता ह्या एकच आहेत. श्रीरामकृष्णांनी त्यांच्या ठायी प्राणिमात्राविषयी मातृभाव जागृत केला. त्यांच्या साध्या, व्रतस्थ जीवनाचा, आत्मसमर्पणाचा आणि यच्चयावत् सगळ्यांना त्यांनी जे मातृप्रेम प्रदान केले त्याचा वृत्तांत केवळ अलौकिक आणि अनुपमेय आहे. त्यांचे सगळे जीवन प्रदीर्घ प्रार्थनामय शांती आणि एकनिष्ठ भक्ती ह्यांनी घडलेले होते. त्यांचे प्रेम जणू नेहमी दुथडी ओसंडून वाहत असे. त्यामुळे ऐहिक जीवनातील चिंता आणि काळजी यांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी आणि चिरंतन शांतीसाठी व्यथितहृदय मानवांना त्यांचे चरण म्हणजे सांत्वनाप्राप्तीचे एक सुनिश्चित स्थान बनले होते. तिन्हीत्रिकाळ आणि सदासर्वकाळ त्यांच्याकडे स्त्रीपुरुषांची रीघ लागलेली असे. आत्यंतिक ओढगस्तीत सापडलेल्या त्यांच्या तळमळत्या जीवांना माताजींचे अमर आशीर्वाद लाभत असत. प्रेमरसाने आणि ज्ञानाने ओथंबलेले त्यांचे मृदुमधुर शब्द ऐकताच भक्तांच्या अंत:करणातील दारुण वेदना कायमच्या नाहीशा होत असत. त्यांचे जीवन म्हणजे ज्ञान, भक्ती आणि कर्म यांच्या परिपूर्ण आदर्शाचे साकार रूपच होते. जगात ह्या तिन्ही गोष्टींचा इतका सुंदर समन्वयात्मक मेळ अन्यत्र क्वचितच आढळतो. अकृत्रिम साधेपणाने, पावित्र्याने, करुणेने आणि आत्मसमर्पणात्मक बुद्धीने नटलेल्या त्यांच्या जीवनाच्या रूपाने आधुनिक हिंदूंना त्यांच्या संस्कृतीने पुरस्कारिलेल्या आदर्श स्त्रीत्वाचाच साक्षात्कार घडला. पतिव्रता पत्नी, पूर्ण संन्यासिनी, प्रेमळ माता आणि आदर्श गुरू, या आदर्श भूमिका त्यांच्या जीवनात एकाच ठिकाणी पाहावयास मिळतात. या दृष्टीने त्यांचे जीवन अपूर्व आहे. खरोखरच त्या जणू ''भारतीय स्त्रीत्वाच्या आदर्शावरील श्रीरामकृष्णांचा अखेरचा शब्दच'' होत्या.


पत्नी दक्षिणेश्वरी आल्यानंतर काही दिवसांनी तिची जणू परीक्षा घेण्यासाठी त्यांनी तिला एकांतात विचारले, ''काय हो, तुम्ही काय मला संसारात ओढण्यासाठी इथे आला आहात?'' सारदादेवींनी विचार करायला थोडाही वेळ न घेता उत्तर दिले, ''नाही, मी तुम्हाला कशाला संसारात ओढू? मी तर तुमच्या इष्टप्राप्तीच्या मार्गात तुम्हाला मदत करायला आले आहे.'' याच दिवसांतील गोष्ट. एके दिवशी रात्री सारदादेवी श्रीरामकृष्णांचे पाय चेपीत असताना त्यांना म्हणाल्या, ''तुम्ही माझ्याकडे कोणत्या दृष्टीने पाहता?'' श्रीरामकृष्णांनी त्वरित उत्तर दिले, ''जी आई (कालीमाता) मंदिरात विराजमान आहे, तिनेच या देहाला जन्म दिला असून ती सध्या नौबतखान्यात राहत आहे; आणि तीच यावेळी माझे पाय चेपीत आहे. खरोखर मी तुम्हाला नेहमीच साक्षात आनंदमयीच्या रूपातच पाहतो.'' या दिव्य दांपत्याचा एकमेकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा असा होता.

श्रीरामकृष्णांच्या महासमाधीनंतर त्यांच्या आध्यात्मिक पुत्रांच्या संगोपनाची जबाबदारी पूज्य माताजींनीच आपल्या शिरावर घेतली. फलस्वरूप महान रामकृष्ण संघाचा त्यांच्या सभोवती विकास झाला. श्रीरामकृष्णांच्या आध्यात्मिक अपत्यांच्या त्या जणू शक्तिकेंद्र बनल्या. ठाकुर व माताजी यांच्यातील संबंध मोठा गूढ होता. माताजींनी आपल्या एका भाग्यवान भक्ताला म्हटले होते, ''बेटा, ठाकुरांकडे व माझ्याकडे अभेदबुद्धीनेच बघ. आम्ही दोघेही एक आहोत.'' या करुणामयी आईने आणखी एकदा स्वत:च्या शरीराकडे बोट दाखवून एका भक्त स्त्रीला म्हटले होते, ''पाहा बेटी, या शरीराला देवशरीर समज. ... मी असेपर्यंत मला कोणी ओळखणार नाहीत. नंतरच लोकांना कळेल.''

२० जुलै १९२० रोजी कलकत्ता येथे पूज्य माताजी महासमाधीत लीन झाल्या.

# माताजी श्रीसारदादेवींचे उपदेश:

- ईश्वर हेच एकमात्र सत्य आहे. अन्य सर्व मिथ्या आहे.जो अनन्यभावाने ईश्वराला शरण जातो तोच तरतो. गुरुवाक्यावर श्रद्धा हवी. जो त्यांच्यावर सर्वस्वी विसंबून राहतो त्याचे ते सर्व संकटांपासून रक्षण करतात. ईश्वराची कृपा हीच एकमात्र आवश्यक गोष्ट आहे. ईश्वरी कृपा प्राप्त होण्यासाठीच प्रत्येकाने देवाला आळविले पाहिजे.
- ईश्वराचा मातृभाव सगळ्या जगाला दिसावा म्हणूनच श्रीरामकृष्ण मला मागे ठेवून गेले आहेत.
- ह्या मानवजन्मात सुख कसे ते मुळी नाहीच. हे जग खरोखरच दु:खाने भरले आहे. येथे सुखाचे नुसते नावच आहे. ठाकुरांची ज्याच्यावर कृपा झाली त्यालाच 'ते साक्षात परमेश्वर आहेत' असे ज्ञान होते. लक्षात ठेवा की हेच एकमात्र सुख आहे.
- ठाकुरांचे नाव घ्या. त्यांच्यावर खूप विश्वास ठेवा. जगात आईवडील हेच मुलाचा आधार असतात, तसेच ठाकुरांनाच आपला आधार समजा.
- ठाकुरांना तुम्ही शरण आला आहात ना, मग तुमचे सारे काही व्यवस्थित होईल. ठाकुरच तुमचे एकमात्र रक्षक आहेत.
- ठाकुरांना नैवेद्य दाखवताना कोणत्याही उपचाराची काहीही आवश्यकता नाही. गुरूने दिलेला मंत्र सगळ्या गोष्टींसाठी अगदी पुरेसा आहे.
- प्रसाद व प्रभू यांच्यात काही फरक नाही. मनात हा दृढ विश्वास बाळगा.
- कशाचाही नाश करण्याकरिता काही ठाकुरांचे आगमन झाले नव्हते. ते केवळ परिपूर्ण करण्याकरिता आले होते.
- परमेश्वराच्या चरणकमली आपले मन केंद्रित करणे आणि परमेश्वराच्या विचारात मग्न होणे हीच अध्यात्मसाधना होय.
- जपतपादी आध्यात्मिक साधनेमुळेच पूर्व कर्मांची बंधने तटातट तुटतात. परंतु प्रेमभक्तीचा अवलंब केल्याशिवाय परमेश्वरप्राप्ती होऊ शकत नाही. जपतपादी आध्यात्मिक साधनांचे महत्त्व तुम्हाला ठाऊक आहे का? त्यांच्यामुळे कर्मेंद्रियांचा प्रभाव कमी होतो.
- दिवस आणि रात्र यांचा संधिकाल प्रभूला आळविण्यासाठी पवित्रतम काळ असतो. त्या वेळी मन शुद्ध स्थितीत राहते.
- मंत्राने शरीर शुद्ध होते. प्रभुनामजपाने मनुष्य पवित्र होतो. तेव्हा नेहमी जप करीत जा.
- परमेश्वर हा आपला अगदी निकटतम आप्त आहे. साधक जितक्या तीव्रतेने जपतपादी अध्यात्मसाधना करील तितक्या द्रुततर गतीने तो परमेश्वराच्या निकट पोहोचेल.
- सतत ध्यान करता करता मन इतके स्थिर होईल की आता हे ध्यान सोडून उठूच नये असे तुम्हाला वाटेल. मनाचा कल जेव्हा ध्यान करण्याकडे नसेल तेव्हा त्याला मारून मुटकून ध्यान करायला लावू नका. अशा परिस्थितीत प्रणाम करावा आणि आसनावरून उठावे. खरे ध्यान स्वयंस्फूर्त असते.
- कर्म तर करायलाच पाहिजे. कर्म करताकरताच कर्मबंधन नाहीसे होते. त्यानंतर निष्काम भाव मनात उदय पावतो. क्षणभर देखील कर्म न करता राहणे योग्य नाही.
- ठाकुरांचे कार्य करा आणि त्याचबरोबर अध्यात्म-साधनाही चालू द्या. मनुष्याने नेहमी काही ना काही काम करीत राहावे म्हणजे मनात कुविचार येत नाहीत. काही काम न करता आपण जर नुसते बसून राहिलो तर मनात नाना प्रकारचे विचारतरंग उठतात.
- चांदण्या रात्री मी प्रार्थना करीत असे. तेव्हा मी देवाला म्हणत असे, ''देवा, चंद्रावर देखील कलंक आहे. पण माझे मन निष्कलंक कर.''
- शब्दांनी सुद्धा कुणाला दुखवू नये. सत्य जर अप्रिय असेल तर ते उगाच कोणाला सांगू नये. कठोर शब्दांचा वापर करण्याने मनुष्याचा स्वभाव रुक्ष बनतो. वाणीवर संयम नसला तर माणसाची विवेकशक्तीही लोप पावते.
- मृत्यू हा नेहमीच अनिश्चित आहे. म्हणूनच, अमुक एक वेळ येईल आणि मग मी धर्माचरण करीन असे कधीही म्हणू नका. जेव्हा केव्हा धार्मिक प्रसंग उद्भवेल तेव्हा त्याचा पूर्ण लाभ घ्या. जी काही धर्मकार्ये मनात असतील ती संधी मिळताच उरकून टाका. लक्षात ठेवा, मृत्यूजवळ काळाविषयीचा कोणताही इष्टानिष्ट विचार नसतो.
- माझे मूल जर चिखलाने भरले किंवा धुळीत लोळले तर धावत जाऊन त्याला उचलणे, स्वच्छ करणे आणि मांडीवर घेणे हे माझे कर्तव्यच नाही काय?
- जे धनवान असतील त्यांनी आपल्या धनाचा उपयोग करून प्रभूची आणि त्याच्या भक्तांची सेवा करावी. आणि जे निर्धन असतील त्यांनी नामजप करून त्या प्रभूचे पूजन करावे.
- संधिकाळी प्रभूंना आळवणे फारच चांगले. रात्र सरते आहे, पहाट होऊ लागली आहे, तसेच दिवस मावळत आहे, सायंकाळ होत आहे – अशा काळाला संधिकाळ म्हणतात. या समयी मन पवित्र असते.
- कोणाला भगवंताची प्राप्ती झाली म्हणजे काय होते? त्याच्या डोक्यावर काय दोन शिंगे फुटतात? – नाही. त्याच्या मनात सत्-असत् विचार येतो. तो जणू चैतन्यमय होतो आणि जन्ममृत्यूच्या पल्याड जातो.
- तुम्हाला जर शांती हवी असेल तर कोणाचेही दोष पाहू नका. दोष पाहायचेच असतील तर स्वत:चेच दोष पाहा. साऱ्या जगाला आपलेसे करायला शिका. जगात कोणीच परके नाही बाळ, सारे जग आपलेच आहे.



# स्वामी विवेकानंद (जन्म १८५३- महासमाधी १९२०)

स्वामी विवेकानंद सत्यद्रष्टे ऋषी होते. ते युगावतार भगवान श्रीरामकृष्ण यांचे अंतरंगीचे लीलासहचर होते; त्यांच्या युगधर्मसंस्थापन-कार्यातील प्रमुख सहायक होते. त्यांनी सनातन वैदिक धर्माला पुनरुज्जीवित केले व सर्वत्र त्याचा प्रसार करून संपूर्ण विश्व चैतन्याने ओतप्रोत करून सोडले. आध्यात्मिक प्रकाशाने परिपूर्ण असे स्वामीजींचे लोकोत्तर जीवन अतिशय स्फूर्तिदायक आहे. त्यांच्या ओजस्वी विचारांत आमच्या देशवासियांच्या हृदयात संजीवनशक्तीचा संचार करण्याचे सामर्थ्य विद्यमान आहे. आज आपल्या राष्ट्रीय जीवनातील असा कोणताच प्रश्न नाही की ज्याचे उत्तर आम्हाला त्यांच्या शिकवणुकीत सापडणार नाही. स्वामीजींचे प्रेरणादायी जीवन आणि विचार यांचा जितका जास्त प्रचार-प्रसार होईल तितकेच आपल्या राष्ट्राचे कल्याण होईल.

वीर हनुमानाचा विचार केल्याशिवाय आपल्याला भगवान श्रीरामचंद्रांचा विचार करता येत नाही, किंवा अर्जुनाचे स्मरण झाल्याशिवाय भगवान श्रीकृष्णांचे स्मरण होत नाही. याचप्रमाणे बुद्धदेव व आनंद आणि येशू ख्रिस्त व सेन्ट पॉल यांचा परस्परांबरोबरच विचार करावा लागतो. श्रीरामकृष्ण आणि स्वामी विवेकानंद यांचाही संबंध अशाच प्रकारचा आहे, कारण श्रीरामकृष्ण हे मूळच्या झऱ्यासारखे असून स्वामी विवेकानंद हे या झऱ्याचे पाणी वाहून नेणाऱ्या प्रवाहासारखे आहेत.

श्रीरामकृष्णांच्या पक्षी ईश्वर म्हणजे सत्य वस्तू आहे. ईश्वरासंबंधी वादविवाद करण्याची त्यांना गरज नव्हती. त्यांना ईश्वराचा प्रत्यक्ष अनुभव आला होता, त्यांना ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन झाले होते. श्रीरामकृष्ण हे भारतीय आध्यात्मिक संस्कृतीचे जणू शिखर होत. त्यांचा दृष्टिकोन वैश्विक स्वरूपाचा असून त्यांची अनुभूती सर्वस्पर्शी, सर्वसमावेशक स्वरूपाची आहे. स्वामी विवेकानंद हे त्यांचे पट्टशिष्य होते, अत्यंत प्रिय शिष्य होते, त्यांचे थोर वारसदार होते, त्यांचे अचूक भाष्यकार होते आणि त्यांचे अत्यंत कुशल असे कार्यकर्तेही होते.

स्वामी विवेकानंदांचा जन्म कलकत्ता येथे दि. १२ जानेवारी १८६३ साली मकर संक्रांतीच्या पवित्र दिवशी झाला. कलकत्त्याचे एक प्रसिद्ध वकील श्री. विश्वनाथ दत्त हे त्यांचे वडील होते आणि भुवनेश्वरीदेवी या त्यांच्या माता होत्या. त्या अत्यंत सुसंस्कृत होत्या आणि त्यांचा जन्म एका थोर घराण्यात झाला होता. मातापित्यांनी मुलाचे नाव 'नरेंद्रनाथ' हे ठेवले. भगवान शिवाची अंत:करणपूर्वक प्रार्थना केल्यामुळे हा मुलगा आपल्याला लाभला अशी भुवनेश्वरीदेवींची श्रद्धा होती. बालक नरेंद्रनाथ घरातील सर्वांचा व शेजाऱ्यांचा अत्यंत आवडता मुलगा होता. बालक नरेंद्रनाथ खोडकर, व आनंदी असून त्याच्या ठिकाणी इतका अधिक उत्साह होता की त्याच्यावर नियंत्रण ठेवणे कठीण जात असे. सर्वप्रकारच्या खेळात तो निपुण होता, तसेच अभ्यासातही तो हुशार होता. अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून तो प्रसिद्ध होता. त्याचे वाचन दांडगे होते, ग्रहणशक्ती विलक्षण होती, स्मरणशक्ती अलौकिक होती आणि वयाच्या मानाने त्याची विवेकशक्ती देखील अद्‌भुत होती. त्याच्या मनात नेहमी सद्‌भावना वास करीत असे. तो गंभीर ध्यानात लीन होऊन राहू शकत असे. त्याच्या वयाच्या इतर बालकांमध्ये ज्या सखोल शक्तींचा अभाव होता त्या शक्ती त्याच्या ठिकाणी प्रकट झाल्या होत्या. बालक नरेंद्रनाथ निर्भय होता, साहसी होता आणि विद्यालयात आणि महाविद्यालयात शिकत असताना तो अत्यंत प्रतिभावान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होता. बालपणापासूनच नरेंद्रनाथांच्या ठिकाणी असामान्य प्रतिभेची व अदम्य शक्तीची चिन्हे दिसून येऊ लागली. त्यांचे एक वृद्ध नातेवाईक 'मुग्धबोध' व्याकरणातील सूत्रे पाठ म्हणत असत. ती सूत्रे ऐकूनऐकूनच नरेंद्राला पाठ झालीत. आईच्या तोंडून ऐकलेल्या रामायण-महाभारतातील कथा तो परत सुंदर रीतीने साभिनय सांगत असे. लहानपणापासूनच तो अतिशय मेधावी, निर्भीड, साहसी व मित्रप्रिय होता. तो श्रुतिधर होता तसाच स्मृतिधर पण होता. ऐकलेले सारे त्याच्या आठवणीत राही – स्मृतिपटलावर कायमचे अंकित होई. अद्भुत शक्तिशाली असे रामभक्त श्रीहनुमान हे बालक नरेंद्राचे आदर्श दैवत होते. म्हणूनच पुढे मोठेपणी बल, वीर्य, साहस, पवित्रता यांचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या हनुमंताची पूजा या जड व निद्रिस्त भारतामध्ये घरोघर व्हावी यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले.

दिव्य शक्तीने युक्त असलेल्या नरेंद्रनाथांना लहानपणापासूनच अतींद्रिय असे अनुभव येत असत. रात्री अंथरुणावर पडल्यानंतर डोळे मिटू लागताच दोन्ही भुवयांमध्ये त्यांना एक ज्योत दिसत असे. प्रथम बिंदुस्वरूप असणारी ही ज्योत हळूहळू विविध रंग धारण करीत असे आणि विशाल होत होत त्यांचे सारे शरीर-मन व्यापून टाकत असे. रोज या अशा अखंड ज्योतिर्मय समुद्रात निमग्न होण्याचा अनुभव घेत घेत नरेंद्रनाथ निद्राधीन होत असत.

तरुण नरेंद्रनाथ विचारवंत होते. ईश्वरासंबंधीची समस्या त्यांना त्रास देत होती. त्यांची बुद्धी अत्यंत तीक्ष्ण असल्यामुळे नुसत्या विश्वासाने कोणतीही गोष्ट ते मान्य करीत नसत. विश्वास ठेवण्यापूर्वी ते प्रमाण किंवा पडताळा मागत असत. ईश्वराच्या शोधात ते पुष्कळ ठिकाणी फिरले, पण कुठेही त्यांचे समाधान झाले नाही. ईश्वराच्या बाबतीत जेव्हा ते जवळजवळ निराश झाले होते आणि 'ईश्वर म्हणजे पागल माणसाची नुसती कल्पना आहे' असे त्यांनी जेव्हा प्राय: ठरवले होते तेव्हा कृपाळू नियती त्यांना श्रीरामकृष्णांकडे घेऊन गेली. त्यांनी श्रीरामकृष्णांना विचारले, ''आपण ईश्वर पाहिला आहे काय?'' श्रीरामकृष्णांनी किंचित हसून उत्तर दिले, ''होय, मी ईश्वर पाहिला आहे आणि तुला सुद्धा मी ईश्वर दाखवीन.'' याप्रमाणे महाविद्यालयात शिकणाऱ्या बुद्धिवादी नरेंद्रनाथांना श्रीरामकृष्णांच्या रूपात उद्धारकर्ते सद्‌गुरू भेटले. यानंतर नरेंद्रनाथ श्रीरामकृष्णांजवळ सुमारे पाच वर्षे राहिले. या काळात श्रीरामकृष्णांनी त्यांना उपदेश देऊन आपल्या कार्यासाठी तयार केले. उत्कट साधनेच्या या अल्प काळात नरेंद्रनाथांनी श्रीरामकृष्णांकडून दिव्य ज्ञान प्राप्त करून घेतले आणि ते त्यांचे संदेशवाहक बनले.

अठरा वर्षांच्या या युवकाला श्रीरामकृष्णांनी प्रथमदर्शनीच ओळखले होते. तो कोण आहे व त्याच्या जन्माचे प्रयोजन काय हे त्यांनी जाणले होते. त्यांच्या योगचक्षूंसमोर नरेंद्रनाथांचा संपूर्ण जीवनपट प्रकाशमान झाला होता. सन १८८१ च्या नोव्हेंबर महिन्यातील गोष्ट. कलकत्त्याच्या

सिमुलिया मोहोल्ल्यातील श्री. सुरेंद्रनाथ मित्र यांनी एके दिवशी आपल्या घरी श्रीरामकृष्णांना त्यांच्या काही भक्तांसह आमंत्रित करून एक छोटासा उत्सव साजरा केला. त्याप्रसंगी एखादा चांगला भजन म्हणणारा हवा होता. सुरेंद्रनाथांनी आपले शेजारी श्री. विश्वनाथ दत्त यांच्या मुलाला – नरेंद्रनाथांना – बोलावून आणले. या तरुण गायकाला पाहताच श्रीरामकृष्ण स्तंभित झाले. अरे! हाच तर तो सप्तर्षिमंडळातला ऋषी आहे. आपल्या अतींद्रिय ज्ञानाच्या साहाय्याने त्यांनी या अपरिचित युवकाला ओळखले होते. नरेंद्रनाथांनी भजन अगदी अंतःकरणापासून म्हटले. ते ऐकून श्रीरामकृष्ण समाधिमग्न झाले. भजने आटोपल्यावर श्रीरामकृष्ण नरेंद्रनाथांजवळ आले. त्यांना एकदा दक्षिणेश्वरी ये म्हणून सांगितले. शिष्टाचार म्हणून नरेंद्रनाथांनीही येण्याचे कबूल केले.

सन १८८१ च्या नोव्हेंबरपासून १८८६ च्या ऑगस्टपर्यंत म्हणजे श्रीरामकृष्णांच्या महासमाधीपर्यंत अशी सुमारे पाच वर्षे नरेंद्रनाथांना या लोकोत्तर अशा देवमानवाच्या सान्निध्यात राहण्याचे भाग्य प्राप्त झाले. या काळात त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन झाले. सर्वभावमय असलेल्या श्रीरामकृष्णांनी नानाप्रकारच्या आघात-प्रत्याघातांच्या, संघर्षाच्या व कठोर साधनांच्या द्वारे नरेंद्रनाथांचे जीवन परिपूर्ण बनवले. जरी नरेंद्रनाथांची श्रीरामकृष्णांवर श्रद्धा होती तरी विचार केल्याशिवाय ते त्यांच्या कोणत्याही गोष्टीवर चटकन विश्वास ठेवीत नसत. ते दक्षिणेश्वरी जात. पण कालीमंदिरात जात नसत. मूर्तिपूजेवर नरेंद्रनाथांचा विश्वास नव्हता म्हणून ते कालीच्या मूर्तीला नमस्कार देखील करीत नसत. श्रीरामकृष्णांना देवदेवतांची अलौकिक दर्शने होतात यावरही नरेंद्रनाथांचा विश्वास बसत नव्हता. त्यांच्या ह्या दर्शन वगैरे गोष्टींची ते अशा शब्दांत वासलात लावत – ''आपल्याला ईश्वरी रूपाचे दर्शन वगैरे होते असे जे आपण समजता ते आपल्याच डोक्यातून निघालेले खूळ आहे.'' परंतु नरेंद्रांच्या अशा बोलण्याने श्रीरामकृष्ण कधीच चिडत नसत. अत्यंत नेटाने ते नरेंद्रनाथांना नाना प्रकारचे शिक्षण देऊन घडवत होते.

१८८६ साली श्रीरामकृष्ण महासमाधीत लीन झाले. त्यावेळी नरेंद्रनाथांचे वय सुमारे तेवीस वर्षांचे होते. श्रीरामकृष्णांनी सोपवलेले कार्य पुढे चालवण्याची फार मोठी जबाबदारी स्वामी विवेकानंदांवर येऊन पडली. हे काही सोपे काम नव्हते, पण ते पार पाडण्याची क्षमता नरेंद्रनाथांच्या ठिकाणी होती. त्यांच्या ठिकाणी बौद्धिक व शारीरिक शक्ती होती. त्यांनी आधीच घराचा त्याग केला होता, ते स्वामी विवेकानंद बनले होते. गुरुबंधूंसह राहण्यासाठी व तपस्या करण्यासाठी त्यांनी एका मठाची स्थापना केली. श्रीरामकृष्णांना केंद्रस्थानी कल्पून नरेंद्रनाथ आणि श्रीरामकृष्णांचे अन्य तरुण भक्त काशीपूर येथे एकत्र झाले. श्रीरामकृष्णांनी त्यांना अगोदरच त्यागमंत्राने दीक्षित केले होते. श्रीरामकृष्णांच्या ज्या शिष्यांनी पुढे संन्यास घेतला त्यांची संख्या सोळा होती. श्रीरामकृष्णांच्या महासमाधीनंतर नरेंद्रनाथांनी आपले एक गुरुबंधू तारकनाथ यांच्या मदतीने कलकत्त्याजवळील वराहनगर या भागात एका पडक्या इमारतीत मठाची स्थापना केली. सन १८८७ च्या जानेवारीमध्ये नरेंद्रनाथ आणि इतर युवक यांनी विधिपूर्वक विरजाहोम करून संन्यास ग्रहण केला. नंतर परिव्राजक बनून त्यांनी देशात भ्रमण केले. भारताच्या उत्तरेकडील टोकापासून ते दक्षिणेकडील टोकापर्यंत – हिमालयापासून ते कन्याकुमारीपर्यंत – त्यांनी प्रवास केला. या प्रवासात त्यांनी मातृभूमीचे निरीक्षण केले, तिच्या समस्यांचे प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त करून घेतले आणि तिच्या उद्धाराच्या योजना तयार केल्या. त्यांच्या जीवनात या तीर्थयात्रेला महत्त्वाचे स्थान आहे आणि या काळात घडलेल्या अनेक घटना त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पाडतात.

अमेरिकेत शिकागो येथे १८९३ साली सप्टेंबरमध्ये एक सर्वधर्मसंमेलन भरणार होते. या संमेलनात उपस्थित राहण्यासाठी स्वामी विवेकानंद १८९३ च्या मे महिन्यात आगबोटीने निघाले. प्रतिनिधी म्हणून त्यांना या संमेलनासाठी निमंत्रण नव्हते. पण काही अडचणींनंतर त्यांना या संमेलनात प्रवेश मिळाला. तेथील पहिल्याच भाषणाने त्यांनी अमेरिकेला जिंकले. त्या विशाल श्रोतृसमूहासमोर भाषण देण्याची जेव्हा त्यांची पाळी आली तेव्हा 'अमेरिकेतील भगिनींनो आणि बंधूंनो' या शब्दांनी त्यांनी श्रोत्यांना संबोधित केले. त्यांच्या या संबोधनाने सर्व श्रोत्यांना व पाश्चात्य जगाला आकर्षून घेतले. संकुचित मतमतान्तरांच्या पलीकडे जाऊन त्यांनी समन्वयावर व विश्वबंधुत्वावर भर दिला. त्यांचा संदेश हा नवजीवनाचा संदेश होता. व्याख्याने देत आणि पाश्चात्यांना भारतीय तत्त्वज्ञानाची शिकवण देत ते अमेरिकेमध्ये बरेच महिने राहिले. तेथून ते इंग्लंड व युरोपमध्ये गेले. त्यांचे जीवन म्हणजे पौर्वात्य व पाश्चात्य यांना जोडणारा सेतू होय.

१८९७ साली स्वामी विवेकानंद भारतात परत आले. त्यांचा सत्कार करण्यासाठी जणू संपूर्ण राष्ट्र उठून उभे राहिले. भारतीय जनतेला ते नूतन आद्य शंकराचार्यांसारखे भासले. मातृभूमीला नवीन जीवन आणि शक्ती देण्यासाठी त्यांचे धराधामी आगमन झाले होते. त्यांनी आपल्या देशबांधवांना त्यागाच्या राष्ट्रीय ध्येयाचे स्मरण करून दिले. भारतात जन्म होणे हे महद्भाग्य आहे असे त्यांनी आपल्या देशबांधवांना आवर्जून सांगितले. तसेच, भारताच्या अमर अस्तित्वाचे कारण म्हणजे त्याची आध्यात्मिक संस्कृती आहे हे त्यांनी भारतीयांना स्पष्ट करून सांगितले. त्यांच्या संदेशाने भारत हा 'प्रबुद्ध भारत' बनला.

पण केवळ व्याख्याने देऊनच ते थांबले नाहीत. ते आदर्श संघटक होते. आपल्या गुरुदेवांचे कार्य पुढे चालवण्यासाठी एखादी संस्था स्थापन करावी असे त्यांच्या मनात आले. त्यांनी रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशन नावाची संस्था सुरू केली. या संस्थेचे मुख्य केंद्र कलकत्त्याजवळ बेलूर मठ येथे आहे. या संस्थेचे उद्दिष्ट आहे – 'आत्मनो मोक्षार्थं जगत्-हिताय च' अर्थात 'आत्मज्ञान आणि मानवसेवा'. ही संस्था म्हणजे मानवजातीला त्यांनी दिलेली महान देणगीच होय.

चाळिशी उलटण्यापूर्वीच ते (४ जुलै १९०२ रात्रीचे ९ वाजून १० मिनिटे) महासमाधीत लीन झाले. पण त्यांच्या वयाचे मोजमाप वर्षांनी करावयाचे नसते, कारण त्यांनी केवळ दहा वर्षांच्या लोकसेवेच्या काळात मानवजातीला असे अमोल विचार दिले आहेत की ज्यांचा पूर्ण विकास होण्यासाठी पंधराशे वर्ष लागतील. त्यांनी जीवनभर जे कार्य केले त्याच्या दोन बाजू आहेत – राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय. या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य व त्यांनी दिलेली शिकवण खरोखरच अलौकिक आहे.

# स्वामी विवेकानंदांचे उपदेश:

- सर्व शक्ति तुमच्या आतच आहे, यावर विश्वास ठेवा. तुम्ही बलहीन आहात यावर कधीही विश्वास ठेवू नका. उभे रहा आणि तुमच्या अंतरातील हे दिव्यत्व प्रकट करा.
- आपण त्या सर्वेश्वराची लेकरे आहोत. आपण त्या अनंत तेजाचे स्फुलिंग आहोत. मग पण चैतन्यहीन कसे असू? आपणच सपूर्ण आहोत. प्रत्येक गोश्टं करण्यास आपण सिद्ध असले पाहिजे, म्हणून मानवाने प्रत्येक गोश्ट केलीच पाहिजे.
- आपले सामर्थ्य, आनंद आणि ज्ञान हे अनंत होऊ शकत नाही. अनंत सामर्थ्य, अनंत आनंद आणि अनंत ज्ञान हे आपलेच आहेतच, आपण त्यांना मिळविणार नाही, ते आपल्या आतच असल्याने आपल्याला त्यांचा अविष्कार मात्र करावयाचा आहे.
- ज्यांचा ईश्वरावर विश्वास नाही ते नास्तिक होत असे प्राचीन धर्मांनी म्हटले आहे. नवा धर्म म्हणतो की ज्यांचा स्वत:वर विश्वास नाही ते नास्तिक होत.
- बल हेच जीवन होय, दुर्बलता म्हणजे मृत्यू. बल हाच परम आनंद होय, शाश्वत व अमर जीवन होय. दुर्बलता म्हणजे सतत भार, सतत चिंता, सतत दु:ख होय; दुर्बलता म्हणजेच मृत्यू होय. लहानपणापासूनच रचनात्मक, शक्तिदायी व साहाय्यक विचारांना तुमच्या मेंदूत प्रवेश करू द्या.
- उठा, धीट बना, शक्तिसंपन्न बना. तुम्ही सगळी जबाबदारी स्वत:च्या शिरावर घ्या आणि जाणून असा की तुम्हीच आपल्या भाग्याचे निर्माते आहात. तुम्हाला हवे असलेले सर्व साहाय्य व सर्व बल तुमच्यामधेच आहे. म्हणून तुम्हीच स्वत:चे भवितव्य घडवा.
- फसवणूक करून कोणतेही मोठे कार्य होत नसते. प्रेम, सत्यनिष्ठा व प्रचंड उत्साह यांच्या द्वारेच महान कार्ये होत असतात. म्हणून आपले पौरुष प्रकट करा.
- वत्सा, ज्यांच्या आत वज्राने बनलेल्या मनाचा वास आहे असे लोखंडी स्नायू व पोलादी मज्जातंतू मला हवे आहेत.
- प्रथम आपण ब्रह्मरूप होऊ या – पूर्णत्व प्राप्त करू या, आणि मग इतरांना ब्रह्मरूप होण्यासाठी, पूर्णत्व प्राप्त करण्यासाठी साहाय्य करू या. ''पूर्ण व्हा व इतरांना पूर्ण करा'' – हेच आपले ध्येयवाक्य असू द्या.
- तुमच्यामधील ईश्वरत्व प्रकट करा, मग त्याच्या भोवती सर्व गोष्टींची सुसंगतपणे जुळणी होऊन जाईल.
- ज्याचे हृदय गरिबांसाठी कळवळते, ज्याच्या हृदयाला गरिबांसाठी पीळ पडतो त्यालाच मी महात्मा म्हणतो; एरव्ही तो दुरात्माच होय.
- जगाचे हित करणे हेच आपले उद्दिष्ट आहे; आपल्या नावाचा डंका चोहोकडे वाजावा हे काही आपले उद्दिष्ट नव्हे.
- मला माझ्या मानवबांधवांना साहाय्य करू द्या – मला फक्त एवढेच हवे आहे.
- मत्सर आणि अहंकार यांचा त्याग करा. दुसऱ्यासाठी एकोप्याने काम करण्यास शिका. आपल्या देशाला याचीच मोठी आवश्यकता आहे.
- पवित्र बनणे आणि दुसऱ्यांचे हित करणे हेच साऱ्या उपासनेचे सार होय. गरीब, दुर्बल व रोगी यांच्यामधे ज्याला शिव दिसतो तो शिवाचा खरा उपासक आणि ज्याला फक्त प्रतिमेतच शिव दिसतो त्याची उपासना केवळ प्राथमिक स्वरूपाची आहे असे समजावे. केवळ मंदिरातच शिवाला पाहणाऱ्या माणसापेक्षा, जो माणूस जाती, वंश, संप्रदाय इत्यादींचा विचार न करता एखाद्या देखील गरिबात शिवाला पाहून त्याची सेवा करतो, त्याला मदत करतो त्याच्यावरच भगवान शिव अधिक प्रसन्न होत असतात.
- तुम्ही एखाद्या धन्याप्रमाणे स्वाधीन भावाने कर्म केले पाहिजे, गुलामाप्रमाणे नव्हे. सतत कर्म करा, पण गुलामाप्रमाणे नव्हे.
- महान त्यागानेच महान कार्ये होऊ शकतात.
- भारताला कमीत कमी एक हजार तरुण माणसांचे बलिदान हवे आहे – लक्षात ठेवा, 'माणसां'चे बलिदान हवे, पशूंचे नव्हे.
- ध्यानात ठेवा की आपण जगाचे ऋणी आहोत, जग आपले ऋणी नाही. जगासाठी काही कार्य करण्याची संधी मिळणे ही मोठ्या सद्भाग्याची गोष्ट आहे. जगाला साहाय्य केल्याने वास्तविक पाहता आपण स्वत:लाच साहाय्य करीत असतो.
- लहान लहान गोष्टींची महानता – हीच आहे गीतेची शिकवण. या गीतेचा जयजयकार असो!
- आपल्या राष्ट्राच्या रक्तात एक भयंकर रोग शिरत आहे, तो म्हणजे प्रत्येक गोष्टीचा उपहास करणे व कोणत्याही गोष्टीचा गंभीरपणे विचार न करणे हा होय.
- 'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत'! – उठा! जागे व्हा! आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका!
- प्रत्येक जीव म्हणजे अव्यक्त ब्रह्म होय. बाह्य आणि अंत:प्रकृतीचे नियमन करून आपले मूळचे ब्रह्मरूप प्रकट करणे हेच जीवनाचे अंतिम लक्ष्य होय.
- कर्म, भक्ती, योग वा ज्ञान यांच्यापैकी कोणत्याही एकाच्या द्वारे वा एकाहून अधिकांच्या द्वारे वा या सर्वांच्या समन्वयाच्या द्वारे हे लक्ष्य प्राप्त करून घ्या आणि मुक्त व्हा.
- संपूर्ण धर्म यातच साठलेला आहे. मतमतान्तरे, विधी, अनुष्ठाने, ग्रंथ वा मंदिरे ही सारी धर्माची केवळ गौण अंगे होत.



